REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# मातंग समाजाच्या स्थित्यंतराचा सामाजिक व भाषिक दस्तऐवज : सुंभ आणि पीळ

डॉ. तानाजी देशमुख
मराठी विभागप्रमुख, वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर.




सोलापूरातील ल. सि. जाधव हे अलिकडच्या काळात दमदार लेखन करणारे साहित्यिक म्हणून परिचीत आहेत. त्यांच्या 'होरपळ' या आत्मकथनास महाराष्ट्र शासनाचा सन २०१२ चा लक्ष्मीबाई टिळक उत्कृष्ट मराठी वाड.मय निर्मिती पुरस्कार मिळाला. सर्वधर्म तत्वज्ञान व आचारधर्म मांडणारी 'पराभूत धर्म' ही त्यांची महत्त्वाची कादंबरी. 'सुंभ आणि पीळ' ही साकेत प्रकाशनाने मार्च २०१४ मध्ये प्रकाशित केली .या कादंबरीला उत्कृष्ठ कादंबरी निर्मितीचा 'शिवाजी सावंत 'हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ही कांदबरी मातंग समाजाच्या स्थित्यंतराचा सामाजिक व भाषिक दस्तऐवज म्हणून महत्त्वाची ठरत आहे.

मातंग हा या देशातील एक आदिम कष्टकरी जनसमूह,पारंपरिक ग्रामव्यवस्थेत शेती व शेतक-यांशी निगडित वस्तू तयार करुन उपजीविका करणारा समाज. श्रमनिष्ठा,भूमिनिष्ठा, कृषिनिष्ठा, समूहभाव ही त्यांच्या जगण्याची थोर मूल्ये. त्यामुळे कृषिसंस्कृतीने मातंगाना आपल्या भाविश्वात आदराचे स्थान दिले. मध्ययुगीन कालखंड, पेशवाई, आंग्लकाळ यामध्ये मातंगांच्या जीवनाची फरफट होत गेली. जातिव्यवस्थेचा पीळ त्यांच्या दु:खदारिद्र्यमय जीवनाला काचत गेला. स्वातंत्र्याच्या संधिकाळात त्यांच्या उपेक्षेची व जगण्याची परवड वाढतच गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभ्या केलेल्या दलित मुक्ती आंदोलनाचा प्रभाव मातंग समाजावरही झाला. पारंपरिक मानसिकता, पारंपरिक व्यवसाय यांना नकार देत बुध्द धम्माच्या व आधुनिक महानगरी जीवनमूल्यांच्या प्रकाशात नवी सामाजिक पुनर्रचना करु पाहणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनाने मातंग समाजात अंतर्बाहय अस्वस्थता निर्माण केली. डॉ. आंबेडकरप्रणित धम्ममार्गाचा स्वीकार करावा की, कृषिनिष्ठ श्रमपरायण जीवनरीत अंगिकारत पुढे वाटचाल करावी या कात्रीत सापडलेल्या मातंग समाजाच्या संक्रमनावस्थेचे वस्तुनिष्ठ व भेदक चित्रण ल. सि. जाधव यांच्या 'सुभ आणि पीळ 'या कादंबरीमधून मराठीत प्रथमच येत आहे.

'सुंभ आणि पीळ' मध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सतरा अठरा वर्षाचा कालावकाश येतो. स्वातंत्र्योत्तर काळात संस्थानिकांच्या विलनीकरनातून निर्माण झालेल्या रझाकारी अत्याचाराने भयभीत होऊन सोलापूरात स्थलांतरीत झालेल्या मादिग आदिम मातंग समाज व मुळचे सोलापूरी मातंग यांच्या समीश्र संस्कृतीचे दर्शन या कादंबरीमध्ये आले आहे.

सोलापूर शेजारी असलेल्या बनशंकरी गावात विस्थापीत झालेल्या मादिग व सोलापूरातील किकरी मातंग समाजाची संस्कृती, रीती- रिवाज, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा, व्यवसाय, आहार, जातीभेद व विषमता, जातीअंतर्गत संघर्ष, लोकदैवते,लोकसंस्कृती,यात्रा, समाजातील स्त्रियांची स्थिती आणि हिंदू संस्कृतीमधील सण ,उत्सव, वारकरी संप्रदायातून निर्माण झालेली कीर्तन परंपरा इत्यादी आशयसुत्राच्या आधारे हिंदू संस्कृती व बदलते समाजवास्तव याचे चित्रण कादंबरीत येते. ' दलित जीवनावरची कादंबरी. मांग जातीच्या विदारक व वास्तव जीवनाचं मी यथाशक्य, नेमकेपणानं चित्रण करण्याचा या प्रयत्न केला आहे.' हे कादंबरीकाराचे मनोगत सुंभ आणि पीळ या कादंबरीच्या

बाबतीव वास्तव आहे.[१] असे कादंबरीकार यांनी मनोगतात म्हंटले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने भारावलेला निष्ठावान कार्यकर्ता केरु आण्णा जाधव मांगुडयातील मातंग समाजाचे प्रतिनिधीत्व करतो.समाजातील लोकांनी शिकले पाहिजे,सुधारले पाहिजे, ऐकी ठेवली पाहिजे असे त्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारप्रणित मत आहे. नागपूरात होणा-या धम्मपरिवर्तनात सर्व समाजाने सामील व्हावे अशी त्यांची इच्छा असल्याने ते सभेचे आयोजन करतात. सभेत सहकार्य मिळत नाही. ते एकटेच बुध्द धम्म स्वीकारतात. डॉ. बाबासाहेबांच्या सभा,मेळावे व बैठकांना उपस्थित राहतात.मातंग समाजातील जातीअंतर्गत संघर्ष मिटवून आधुनिक मूल्ये रुजवू पाहतात. अल्पसंतुष्ट दिशाहीन मातंग समाजातील तरुण पिढीला दिशा दाखविणारे समाजनिष्ठ मार्गदर्शक ठरतात. समाज उध्दाराच्या व्यापक दृष्टिने कार्यमग्न व सततची पायपीठ यामुळे कॅन्सर सारख्या आजारातच त्यांचा मृत्यू होतो. जन्माने हिंदू असलेले केरु आण्णा धर्मांतराने बौध्द झालेत. अंतविधी कोणत्या धर्माप्रमाणे करावे ,असा प्रश्न उपस्थित होतो. केरु आणांचा मुलगा श्याम म्हणतो, 'माझे वडील समद्या समाजाचे व्हते, तूमाला जे योग्य वाटंल तसं करा. ' दोन्ही पध्दतीने अंत्यविधी करावयाचे ठरते. प्रेत्रयात्रेत 'बुध्दं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि, संघं सरणं गच्छामि, ' व 'रामनाम सत्य है'असे म्हणायला सुरुवात झाली. केरु आण्णाच्या शेवटच्या प्रवासात या दोन जाती अशा रीतीने एकत्र मिळून जात होत्या. केरु आण्णाप्रमाणेच मांगुडयातील सर्व वडीलधारी माणसे मरतात. पारंपरिक व्यवसाय आधुनिकतेच्या रेटयात संपतो.इथे कादंबरी संपते.

कथानकाची सुरुवात स्थलांतराच्या प्रश्नाने होते. शेवट आधुनिकतेने निर्माण केलेल्या पारंपरिक व्यवसायाच्या प्रश्नातच खुला झाला आहे.कथानकाचा बाज वेदना, नकार,उपरोधिक आहे. संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झालेली सुधारणावादी हवा, संस्कृतीनिष्ठता, अंधश्रध्दा, वारकरी भक्तीमयता, सण-उत्सवप्रियता,दु:खदारिद्रयामधून अनेक प्रसंग निर्माण होतात. यातून स्वातंत्र्योत्तर काळातील यथार्थ समाज दर्शन घडते. जीवनाचे विविधरंगी व विविधढंगी वास्तव प्रगट करणे, हे इतर कथात्म साहित्याप्रमाणे कादंबरीचे उद्दिष्ट आहे. याच दृष्टिने आधुनिक कादंबरीकाराचे सतत प्रयत्न होत असतात. [२]

'सुंभ आणि पीळ' या कादंबरीत केंद्रीभूत अशी व्यक्तिरेखा नाही. समाज हाच या कादंबरीचा नायक आहे. डॉ बाबासाहेबांचा कार्यकर्ता केरु आण्णांचा ज्यांच्याशी संबंध येतो अशी विविध जाती धर्माची, विविध सामाजिक स्तरांमधील अनेक माणसे या कादंबरीत भेटतात.त्या त्या प्रसंगानुरुप आवश्यक असे त्या व्यक्तिचे चित्रण कादंबरीमध्ये आले आहे. हजामतीचे काम करणारा बाबूनाना, ठिलार आणि बेरकी ना-या, आपल्या जिवाचे बलिदान देऊन मातंग समाजाच्या समर्पन वृत्तीचे दर्शन देत देवपण पावलेला मांगुबा, वारकरी रणदिव बुवा, केरु रामा, मादिगांना असरा देणारे बनशंकरी गावचे आप्पाराव पाटील, मादिगातील ल्हान्या, रेवा आणि चंडिप्पा ही आदिवासी पोरं, 'पोतू आरमू' विधीत दाताने कोकराचे नरडं तोडणारा भिका पोतराज, भानुवारु,जंगलगीरु व सुग्रीवा हे मादिग देवऋषी, केरु आण्णांकडून पैसे नाकारणारे केळुस्कर वकील, 'किंगरी' या वाद्याच्या साहाय्याने 'जातीपुराण' व 'बसवपुराण' या आख्यानकाव्यातून मातंगाची कुळकथा व मूळकथा सांगणारा मातंगाचा मागत्या डक्कलवार पिरा कांबळे, धाडसी, तापट, उनाड,निर्दयी असली तरी मान राखणारी सिरप्या, गनप्या, परशा,आंब्या व धन्या हा पाच बोटाचा पंज्या.अशी विविध स्तरातील पुरुष पात्रे घटना,प्रसंगाच्या निमित्ताने आली आहेत.

याशिवाय मेंगळट बेरड हनुमंता यांची काळीच पण नाकशार असणारी पांचाळ सिध्दाप्पा बरोबर पळून जाणारी सुब्बा, स्टेशनाबाहेर वाळकं विकणारी रंडकी हौसाबाई, देवऋषीपण बधणारी जकव्वा आम्मा, भेळपुरीचा गाडा चालविण्यास इकबालला मदत करणारी फरिदा, धन्याने पळविलेली चेंदिचेडी, दोन्ही हातात फिरकी घेऊन फिरवत मागेमागे जाणारी शेवंता, आंब्याबरोबर तुळजापुरात विवाह करणारी रेणू, मुंबईत वेश्या व्यवसाय करणारी शांताबाई, समाजमान्येतेचा विचार न करता डक्कलवार स्त्रियांना कुंकू लावणारी पुरोगामी राधाबाई अशा अनेकविध स्त्रिया आपल्या दु:ख, वेदनासह कादंबरीत येतात.

निवेदन हा कांदबरीचा महत्त्वाचा घटक होय. या कादंबरीत केवळ प्रथमपुरुषी किंवा तृतीयपुरुषी निवेदनाऐवजी आशयानुरुप निवेदन पध्दतीचा वापर केला आहे. मातंग समाजाची पारंपरिक मनोवृत्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रभावाने संक्रमणावस्थेचे चित्रण निरनिराळया प्रसंगातून केले जाते. निवेदनात इतर पात्रे ही सहभागी होतात. निवेदनामध्ये वर्तमानपत्रातील बातमी, जाहीर प्रकटन याचा कौशल्याने वापर केला आहे. मांगुबाची दंतकथा, जातीपुराण व बसवपुराण या सारख्या आख्यानकाव्याचा लोकाविष्कारातून प्रभावी चित्रण गतीमान होते. केरु आणांच्या मनातील द्वंद्व मनोगतातून व्यक्त होते. तपशीलाने घटनेचे निवेदन केल्यामुळे वाचकांसमोर तो प्रसंग साक्षात साकार होतो. परशांच्या जटा

---

[1] जाधव, ल.सि., सुंभ आणि पीळ, साकेत प्रकाशन,आ.प्रथम २०१४, मनोगत पृ ०५

[2] मराठी वाङ्.मयकोश, संपा. राजाध्याक्ष, विजया, म.रा. सा. आणि सं मंडळ, मुंबई, खंड चौथा, पृ ८२

कापणे, राधाबाईचे डक्कलवार स्त्रियांना कुंकू लावणे, सभेतीत पवार मेंबर व मास्तरांचे मनोगत या सारख्या प्रसंगातून समता, स्वातंत्र्य,बंधूता,समूहभाव, विज्ञाननिष्ठा यासारख्या माणूसकेंद्री आधुनिक मूल्यांचे दर्शन घडते. समाजात उत्कृष्ट विचारांचा व पुरुषार्थाच्या कल्पनांचा प्रसार करणे, हे कादंबरीचे प्रमुख कार्य आहे.[3] असे कादंबरी या साहित्य प्रकाराबद्दलचे विवेचन वि. का. राजवाडे यांनी केले आहे. हे सुंभ आणि पीळ या कादंबरीत जाणवते.

भाषा हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. भाषा लेखकाचा हेतू, दृष्टिकोन , त्याचे आशयाचे आकलन यांच्याशी सुसंगत असते. कादंबरीत संवादाची भाषा वेगळी व निवेदनाची भाषा वेगळी असते. परंतु या कादंबरीत संवाद आणि निवेदनाची भाषा एकच आहे. संपूर्ण कादंबरी ही मातंगाच्या विशिष्ट बालीभाषेतून 'आंबुज शैलीत'( मातंग बोली) लिहिली आहे. मातंग जाती- जमातीच्या जगण्यातील वास्तव ,दाहक व विदारक चित्रण लेखकाने आपल्या समर्थ, ओघवत्या, नितळ शैलीतून केले आहे.आशयघनता वाढविणा-या म्हणींचा औचित्यपूर्ण वापर या कादंबरीत आहे. 'हाडाचं खाई त्येंच दात जाई', 'किकरी मांग आन् भल्तीच खबर सांग', 'वाक पन मनानं पाक', ' घामातनं उगवती केकत,आन् खारपं उचला वाकत', 'पायी न्हाय पायतान आन् काटयाचं कियतान', 'पापाचं धन करी मळकं मन', ' घडीत गोड आन् घडीत दोडं', 'शिंदळला सोडायच आन् पतिवरतेला झेंगाट लावायचा', खाजवून आवदान काढण', 'नासकं खवळल आन् पोटात ढवाळल', 'मालकापरिस कारभारी भारी', 'आगीतन फुफाटयात पडणं', 'हमारी बिल्ली हामकु म्याव', 'वगाच्या आदी गवळण', 'वळलं तर सूत न्हातर भूत', 'बुडत्याचा पाय खोलात', 'उघडयाजवळ नागडं गेल आन् थंडीन मेल', 'उस गोड लागला म्हणून मुळा संगट खाऊ नी', 'सटवीचा लिखा आन् कधी न्हाय चुका' यासारख्या म्हणी व 'पैल्या घासाला खडा', 'हातावरच पोट', 'कष्टाच चीज', 'ढगात गोळया', 'लेंडी पातळ हुयाची', 'काशीत घाला', 'खतलकी रात', 'पावनं सोडनं', 'हडप करु लागले', 'थारा देयाचा', 'पाणी लावताव', 'गव-या फुड गेल्या', 'वागर लावणे' असे वाक्यप्रचार पानोपानी आले आहेत.

काव्यात्मकता हे या कादंबरीचे खास सामर्थ्य आहे.रजाकारच्या तळपत्या तलवारीपरीस हे तळपतं उन बर( पृष्ठ.१३) आंदूक आंदूक दिसू लागलं, धुंधंक धुंधंक वाटायला लागलं( पृष्ठ ४५) शिलंगन खेळून आलं दर्याच्या काठी, सोन पवळयाच्या झाल्या लोटी, सोनटाका आमच्या ताटी ( पृष्ठ ८७) या सारख्या यमकादी रचना कादंबरीत पाहावयास मिळतात. उपमांचं आकर्षण लेखक ल. सि. जाधव यांना अधिक आहे. चंद्रभागेच्या वाळवंटात वारक-यांची दिंडी उतरावी तसा मादिग मांगाचा जथा मीमेच्या किना-यावर उतरला(पृष्ठ १५), मांगुडा नव्या नवरदेवावनी नटला ( पृष्ठ २१) , पेटलेली आफवा तितल्यातिथ इजली, फूसक्या लक्ष्मी तोटयावनी ( पृष्ठ ११२), लालभडक कलींगडवानी सूर्येनारायेण( पृष्ठ ११५), जातीयता तशीच घट्ट नाडयावानी आजूक मजबूत हाय(पृष्ठ १३८), पोरी लवकर शिळया भाजीवानी सुकुन जायच्या (पृष्ठ १५८)

निर्जीव वस्तुत चेतना निमार्ण करण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे. 'पंतीत वात शांत जळतं व्हती, आपल्या परीन समूर उजीड सांडत', ' नागदिव कवाच इजून झोपलं व्हतं', 'संध्याकाळ आपल्या पाठीवर आंदाराच वझं घेऊन येईल', 'तोपर्यंत चांदुबाबी उजीड सांडत आला'.

लेखक ल. सि. जाधव यांची प्रगल्भ वैचारिक जाणिव कांही अवतरणातून जाणिवते. 'मानसाला माज पुना लयच रानटी करुन टकातो', 'नरकबी नाकाला पदर लावल इतकं आगुरी' , 'बदनामी ही शिंदळ असते तिच्या उधळण्याला कोण आवरणार', 'रानटीपण निबार झाल येकदा की, ते सजासजी न्हाय लवकर नीट वळंत' , 'पोट मानसाला शिंदळीवाणी वागाय लावत'.

पोतराजाच्या पायातलं चाळ आन् कडं हालग्याच्या चालीवर 'ढंगाळांग चिंगाळांग आवाज काढू लागलं', 'कोकरु ब्यॉं ऽ ब्यॉं करु लागलं'. यासारख्या ध्वन्यानुकारी रचना कादंबरीत आहेत. नामाला जोडून येणारी विशेषण आंबूज शैलीची वेगळी धाटणी प्रकट करतात. उदा. भै-या इटूबा, देस-या मसुबा, बैदुल्या सिरपा, भोंगळ लेकरु, जगरीतीच्या बाता, ब्याळ ब्याळ शिव्या, वादाडया पोरवाफुडं, आवचिंद गाबडी, गरम गरम खमंग शिवी, बढाई बातां, नासकं तोंड, कवळी रात, आंदारी कुच्चा, सटीचा मार्गशीर, किरमिट ढेकर इ. कांही ठिकाणी सुटारला, टोळकायची अशी क्रियापदे . कडू, आयघाल, डळया, हिलगड, आवचिंदझ्यार यासारखे आंबूज शैलीनिष्ठ शब्द व हांड्रेटवर, फुलकटींग, आयटम, टाईमपास, रेडीवो, पोगराम, बॉडी, चानस, संडे या सारखे इग्रंजी शब्दाची बोली रुपे आली आहेत.

बनशंकरी गावाची माहिती, मांगुबाची दंतकथा, पोतू आरमू, रामनवमी, या सारख्या प्रसंगनिर्मितीतून लेखकाच्या चित्रस्पर्शशैलीचे सामर्थ्य लक्षात येते. हाडकं गोळा करणा-या स्त्रियांना वैरनीचा रेट विचारणे, (पृष्ठ ८१) , भेळपुरीवाल्याला मालपुरी हाय काय? असा प्रश्न विचारणारी आंब्या व भग्या( पृष्ठ १३२) या सारख्या प्रसंगातून लेखकांनी उपहासात्म व उपरोधिक शैलीचा औचित्यपूर्ण वापर करुन विनोद साधला आहे.

[3] वि.का. राजवाडे, गो.मा. पवार/ म.द. हातकणंगलेकर, संपा., कादंबरी, पृ २५

सारांश, मातंग समाजाच्या स्थित्यंतराचा, जीवनविषय धारणांचा, समकालीन सामाजिक, राजकीय,सांस्कृतिक ताण्याबाण्यांचा व्यापक पट कादंबरीत साकारतो. मातंगाच्या आंबूज या वैशिष्टयपूर्ण भाषिक शैलीतून त्यांच्या जगण्याचा तळ चित्रित करणारी ही कलाकृती भाषिक, वाड्.मयीन व सामाजिक अंगाने महत्त्वाची आहे. मातंग समाजाचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, त्यांची वैशिष्टयपूणे पोटसंस्कृती, जीवनमूल्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनाचा प्रभाव, त्यामुळे समाजात अंतर्बाहय निर्माण झालेली अस्वस्थता, त्यातून उदयास आलेले ताणतणाव, कमालीचे कष्टमय , दु:खदारिद्रयात बुडालेले जीवन, जगण्याच्या कोलाहलातही स्वत्व व सत्व टिकवून धरणारी जीवनधारणा, अशा कितीतरी गोष्टींचा सामाजिक पट कांदबरीमध्ये येतो. मातंगांच्या सामाजिक संक्रमणाचा व भाषिक संस्कृतीचा इतिहास 'सुंभ आणि पीळ' या कांदबरीद्वारे प्रथमच उजेडात येत आहे.